# चैतन्य लहरी

सप्टेंबर-ऑक्टोबर २००९



मराठी



मला सर्व माहीत आहे, मला तुमची खूप काळजी आहे. तुम्हा सर्वांचीच. मला माहिती आहे की तुम्हे कुठे उभे आहात, तुम्हाला काय त्रास आहे. काय करायला पाहिजे, तुम्हाला काय आवडते आणि काय आवडत नाही.

पर्थ, ऑस्ट्रेलिया, ९/२/१९९२

# या अंकात



श्री महाकाली पूजा - १



विशुद्धी तत्त्व - ७



लाल भोपळा-गाजर
खीर - १९

# व इतर

सहज विवाह - १५

# श्री महाकाली पूजा

**कोलकाता, ०१ एप्रिल १९८६, अनुवादित**

२१ मार्चपासून तुम्ही माझा वाढदिवस साजरा करीत आहात आणि मुंबईतही मोठ्या उत्साहाने चार दिवसापर्यंत साजरा केला गेला आणि त्यानंतर दिल्लीमध्ये वाढदिवस साजरा करण्यात आला. आजही असे वाटते की, तुम्ही माझा वाढदिवस साजरा करीत रहावा. ज्याप्रकारे हा मांडव फुलांनी सुंदर सजविला गेला आहे आणि विविध रंगानी सर्व शोभा अत्यंत द्विगुणित झाली आहे. .......सर्व कलाकारांना बघून असे वाटते की, त्यांनी कशाप्रकारे अगदी मनापासून इतक्या कमी वेळात अतिशय प्रतिभाशाली गोष्टी बनविल्या आहेत! आज विशेष गोष्ट अशी आहे की, जास्त करून ह्या दिवसात जेव्हा ईस्टर असतो, मी लंडनला असते आणि प्रत्येक ईस्टर पूजा लंडनलाच असते. तिकडच्या लोकांनी कळविले की, 'आई, काही हरकत नाही. तुम्ही कुठेही असाल, जिथे कुठे तुमची पूजा असेल तिथे फक्त आमची आठवण करा आणि त्या दिवशी आम्ही इथे ईस्टर पूजा करू.' इतक्या सुंदरतेने, इतक्या लवकर सर्व पूजेची तयारी होणे ही सर्व त्या परमात्म्याची अत्यंत कृपा आहे, ज्यांनी ही सर्व व्यवस्था केली. परंतु इथे आज एका मोठ्या कार्याला आरंभ होत आहे.

आतापर्यंत मी राक्षसांविषयी पुष्कळ वेळा खूप काही बोलले आहे आणि तेही अगदी मोकळेपणाने त्यांच्याविषयी सांगितले आहे. ते किती दुष्ट आहेत, किती राक्षसी आहेत आणि कोणत्या प्रकारे ते खऱ्या साधकांची वाट अडवितात आणि त्यांना गैरसमजुतीच्या वाटेवर घालून त्यांची दिशाभूल केलेली आहे. त्यामुळे बऱ्याच लोकांनी सांगितले, की अशी गोष्ट करणे चांगले नाही. ह्यामुळे........दुष्ट लोक तुमच्यावर आक्रमण करतील, ते तुम्हाला त्रास देतील. परंतु झाले नेमके ह्याच्या उलट. कोणीही आम्हाला कचेरीचा रस्ता दाखविला नाही, ना ही कोणी माझ्याबद्दल काही बोलले. एक एक करून प्रत्येक दुष्ट समोर आला आणि संपूर्ण जगाला समजले, की मी जे जे ह्या लोकांबद्दल (दुष्ट) सांगितले होते ते एकदम सत्य आहे. आज हळूहळू हे अगुरू नष्ट होत आहेत. परंतु अजूनही तांत्रिकांचा जोर आहेच आणि माझ्या अंदाजे तुमच्या ह्या कलकत्त्यात ह्या गोष्टीचा प्रमुख उगम आहे. इथे त्यांची वाढ होते आणि इथूनच ते संपूर्ण जगात पसरतात. आजच ज्या व्यक्तीची भेट झाली त्यांच्याशी इतक्या तांत्रिकांवर बोलणे झाले. त्यांनी सांगितले की, कोण कोण त्यांच्या आश्रयाला आलेले आहेत आणि कोण कोण महात्मा बनले. मला वाटतं आता ते अभियान सुरू झाले. तांत्रिकांना एक एक करून ठीक करणे जरूरी नाही. सर्वांना एकत्र गंगेमध्ये धुवून टाकायला हवे. तेव्हा कुठे हे सुधारतील. तेव्हा आजपासून हा महिषासुर सर्वत्र पसरलेला आहे. त्याला संपवून टाकायचे अभियान सुरू करायला हवे. ही सर्वात मोठी आत्मिक क्रांती आहे ज्यामुळे संपूर्ण विश्वाचे कल्याण होणार आहे. संपूर्ण जग ह्या क्रांतीने पवित्र होईल आणि आनंदाच्या सागरात, परमेश्वराच्या साम्राज्यात राहील. परंतु त्यासाठी प्रत्येकाला धैर्याने कशा न कशाचा त्याग करावा लागेल. ह्यासाठी सर्वात मोठी गोष्ट म्हणजे हिंमत ठेवावी लागेल. जर धैर्याने काम केले तर तो दिवस दूर नाही जेव्हा आपले संपूर्ण विश्व सुखाने भरून जाईल.



# एका मोठ्या कार्याला
## सुरुवात होत आहे ...



सर्वप्रथम ही गोष्ट व्हायला हवी ती म्हणजे आपले जे इतर सहजयोगी भाऊ-बहिणी आहेत

## त्यांच्यापुढे बाकी सर्व परके आहेत.

ह्यामध्ये सगळ्यात मोठी अडचण ही येते की, सहजयोगी गहनतेत उतरत नाही. सहजयोग्यांना हवे की त्यांनी गहनतेत उतरावे. प्रत्येक सहजयोग्यावर ही जबाबदारी आहे की, ह्या क्रांतीमध्ये त्यांनी असे कार्य करायला हवे की, जे एक विशेषरूप धारण केलेले असेल. आतापर्यंत मी जे सहजयोगी बघितलेत त्यांच्यात अशी गोष्ट असते की, 'आमचे हे पकडले आहे श्री माताजी, आमचे हे चक्र पकडले आहे. आमचे हे होतंय. आमच्यामध्ये अजून हा दोष आहे. असं आहे, तसं आहे.' परंतु जेव्हा तुम्ही द्यायला लागाल, दुसऱ्यांना द्यायला सुरू केल्यानंतर, दुसऱ्यांचा उद्धार करायला सुरुवात केल्यानंतर हळूहळू ह्या सर्व गोष्टी कमी होऊ लागतील. आपले चित्त इथेच स्थिर व्हायला पाहिजे की, मी किती लोकांना दिले. किती लोकांना मी पार केले. किती लोकांना मी सहजयोगात आणले आहे. जोपर्यंत आपण हे कार्य जोरात करत नाही, तोपर्यंत सहजयोगाचे कार्य पुढे जाऊ शकणार नाही. त्यासाठी अजून पण काही गोष्टी व्हायला हव्यात. एक वर्षाच्या आत गोष्ट व्हायला हवी असा जर विचार केला तर त्यापैकी एका गोष्टीचा असा विचार केला आहे की, असा एक आश्रम बनवायचा जिथे सहजयोगी वेगवेगळ्या ठिकाणाहून येऊन राहतील आणि त्यांना सहजयोगाबद्दल संपूर्ण माहिती, पूर्ण परिचय दिला जाईल. एवढेच नव्हे तर त्यांची पूर्णपणे कुंडलिनी जागृत केली जाईल आणि अशाप्रकारे ते आपल्या विश्वात एका मोठ्या, महान योगीच्या रूपात कार्यान्वित होतील. ह्या प्रकारच्या व्यवस्थेचा विचार करीत आहोत. माझ्या अंदाजे एक वर्षभरात काही ना काही अशी गोष्ट बनेल जिथे तुम्ही सर्व कमीत कमी एक महिना येऊन राहू शकाल. तिथे राहून सहजयोगात तुम्ही पारंगत व्हाल आणि एक निष्णात, प्रवीण सहजयोगी बनून पूर्ण विश्वात हे कार्य करू शकाल.

सर्वात मोठी गोष्ट ही आहे की, आपला आतल्या आत असा एक प्रकारचा अविश्वास वाढत आहे, एक प्रकारची बेपर्वाई आहे त्यातून आपल्याला बाहेर पडायला हवे. मी तुम्हाला सांगू इच्छिते इथे एक डॉ.वारेन आहेत. हे जेव्हा सहजयोगात आले तेव्हा ते माझ्याकडे जास्तीत जास्त आठ दिवस राहिले. त्यातून पूर्ण वेळ ते सुरुवातीला भांडतच राहिले. त्यांना काहीच समजत नव्हते की, स्वत:ला कसे ठीक करावे? काहीही असो, त्यांनतर ते बरे झाले आणि परत ते ऑस्ट्रेलियाला निघून गेले. ऑस्ट्रेलियाला परत गेल्यानंतर त्यांनी तेथे कित्येक लोकांना पार केले. कित्येक लोकांना मार्गाला लावले. मला मोठे आश्चर्य वाटले ज्या माणसाने कधी गणेश काय आहेत हे कधी समजून घेतले नाही. ज्याने कधीच कोणत्याही देवतेचे पूजन केले नाही. ज्याला कधी कुंडलिनी काय आहे हे ही माहीत नाही अशा व्यक्तीने आठ दिवसाच्या आत इतक्या चांगल्या प्रकारे प्रगती करून संपूर्ण ऑस्ट्रेलियात पसरवले. आपण हा विचार नाही करायला पाहिजे की हे काम आपण करू शकत नाही. हे मी कसे करू? ह्यात अडचण ही आहे की, लोक काय म्हणतील? ह्या प्रकारची जर तुम्ही स्वत:ची विचारधारणा ठेवली तर सहजयोग पुढे सरकणार नाही. परमेश्वर तुमच्याबरोबर आहे. शक्तीही तुमच्याबरोबर आहे. तुम्ही स्वत: योगी आहात. आता सर्व योग्यांवर जबाबदारी आहे, की त्यांनी ह्या कार्याला पूर्ण करावे. जोपर्यंत तुम्ही संघटित स्वरूपात रहात नाहीत तोपर्यंत हे कार्य होऊ शकत नाही. तेव्हा तुम्हाला संघटित रहावे लागेल. संघटित राहणे ह्याचा अर्थ असा आहे की, तुम्ही एकाच शरीराचे अंग-प्रत्यंग आहात. एका सहजयोग्याने दुसऱ्या सहजयोग्यापासून कधी वेगळे समजू नये. ज्याप्रकारे मी बघत आले आहे. सुरुवातीला सहजयोगी, जी व्यक्ती सहजयोगी नाही त्याच्याकडे खूप झुकला जातो. सर्वप्रथम ही गोष्ट व्हायला हवी ती म्हणजे आपले जे इतर सहजयोगी भाऊ-बहिणी आहेत त्यांच्यापुढे बाकी सर्व परके आहेत. कोणी काहीही बोलो, त्यांच्याबरोबर आपले एकमत नसावे कारण ते आपल्याला जाळ्यात अडकवतील

आणि आपल्यामध्ये फूट पडेल. या असुरी विद्येपासून जर तुम्हाला स्वत:ला वाचवायचे असेल तर तुम्हाला हे समजले पाहिजे की तुम्ही योगी आहात आणि तुम्ही परमेश्वराच्या साम्राज्यात आहात. प्रत्येक असुरी विद्येचा एक, एक एजंट आहे. समजून घ्या तो तुम्हाला खेचायला बघतो, की तुम्ही या विद्येपासून बाजूला व्हा आणि त्यांच्या विद्येचा स्वीकार करा. त्यांची चलाखी इतकी सुंदर असते की तुम्हाला ती समजणार नाही. यासाठी पहिली गोष्ट म्हणजे एका सहजयोग्याने दुसऱ्या सहजयोग्याच्या विरोधात जाऊ नये आणि कोणताही ग्रुप बनवू नये. जर कुठे सहजयोगाचा ग्रुप बनू लागला तर तो मी तोडून टाकते आणि असे तोडले आहे. जसे ग्रुप बनले तेव्हा दिल्लीवाले झाले. मग दिल्लीमध्ये करोल बागचे झाले. तर कोणी कुठले झाले. मुंबईचे झाले. मुंबईमध्ये कोणी नागपाड्याचा, कोणी दादरचा झाले. कोणी कुठले झाले. असे करत करत तुम्ही एका अशा छोट्या जागेत येऊन पोहोचाल जिथे तुम्ही फक्त एकटेच बसलेले असाल. तुम्ही सहजयोगी कुठे गायब झाले? तेव्हा इथे कोणताही ग्रुप व्हायला नको. जेव्हा मनुष्यामध्ये कॅन्सर होतो तो या ग्रुप बनवण्यामुळेच. जर एखाद्या मनुष्यामधील डीएनए खराब झाला, एखादी पेशी खराब झाली तर तो दुसऱ्या पेशीवर जोर करेल, दुसरी पेशी तिसऱ्या पेशीवर जोर करेल आणि असा त्यांचा एक समूह बनत जाईल. त्याला वाटेल आपला जो समूह त्याचे सर्वांवर प्रभुत्व असावे. जेव्हा सर्वांवर त्याचा जोर वाढू लागतो जसे की समजा तुमच्या नाकाच्या पेशी आहेत त्या जर वाढू लागल्या तर त्यांचा एक समूह बनून त्याची गाठ होईल आणि त्यांनी आक्रमण करून डोळे झाकले जातील. तिथून जाऊन कानही झाकले जातील. अशाप्रकारे कॅन्सर जो असतो तो आपल्यापेक्षा दुसऱ्यांना खालच्या दर्जाचा समजतो आणि एक समूह बनवून जे सहजयोगी आहेत त्यांना दाबायचा प्रयत्न करतो. जर अशा प्रकारचा आजार सहजयोगात पसरला तर त्यांना मी ठिकाणावर आणते. मग मी कोठेही असेन, मी लंडनमध्ये असेन किंवा अमेरिकेत असेन कोठेही असले तरी त्यांना आपोआप ठिकाणावर आणले जाते यासाठी कोणीही समूह बनवू नये. कोणीही असा विचार करू नये की आम्ही एका समूहाचे आहोत. समजा दहा माणसे एकत्र रहात असतील आणि प्रत्येकवेळी तीच दहा माणसे एकत्र येत असतील समजून घ्या की त्यांचा समूह बनतो आहे. सहजयोग्यांनी कधीही एकावेळी दहाजणांनी नेहमी राहू नये. जर आज एखाद्याबरोबर बसला असाल तर उद्या दुसऱ्यांबरोबर बसा. जसे की आपल्यामध्ये रक्ताच्या छोट्या-छोट्या पेशी असतात ज्यांना आपण सेल्स म्हणतो. जर समजा त्या एकाच जागी बसल्या, दहा पेशींनी हा विचार केला की आम्ही इथेच बसून राहणार तर त्या मनुष्याचा मृत्यू होईल. सहजयोग्याचा मृत्यू होईल. ब्लड सरक्युलेशन म्हणजे रक्ताभिसरण जे आपल्यामध्ये होते....... कोणताही ग्रुप बनवून चालणार नाही. जिथे ग्रुप बनतोय असे तुम्हाला दिसले तर तो ग्रुप सोडून दुसरीकडे जा. तो ग्रुप तोडा. त्यांना सांगा या ग्रुपबरोबर या आणि तो त्या ग्रुपबरोबर येईल. अशाप्रकारे तुम्ही करत नाही तोपर्यंत तुमच्या कलेक्टिव्हिटी मध्ये नकारात्मकता येईल. जसे मी म्हणते की ताक घुसळून लोणी काढले. लोण्याचे कण चारही बाजूला आहेत परंतु त्यात तुम्ही एक मोठा लाण्याचा गोळा घेतला की त्याच्या आजूबाजूला जे कण असतात ते त्याला येऊन चिकटतात. परंतु चार, पाच, सहा कण मिळून वेगळे बसले तर. तो ताक घुसळणारा म्हणतो 'जाऊ दे, बेकारच आहे हे लोणी. याला सोडून द्या. जो मोठा गोळा आहे त्याला घेऊ या.' सर्वांनी मिळून एका मोठ्या लोण्याच्या गोळ्यासारखे स्वरूप असेल. याप्रकारे आपल्यालाही एक मोठा ग्रुप बनवायला पाहिजे. असे करत तुम्हाला एका मोठ्या सागरात विलीन करायचे आहे. फक्त चार-पाच थेंब बनवून एक बुडबडा बनायचे, जो दोन मिनिटासाठी येतो आणि नष्ट होतो! आपोआपच निसर्गाकडून हे होत असते. त्याला काही करायची जरूरी नाही. म्हणूनच कोणताही ग्रुप तुम्हाला बनवायचा नाही. सर्वांबरोबर मिळून मिसळून रहा, सर्वांनी बरोबर जा. सर्वांशी प्रेमाने रहा आणि सर्वांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. एकमेकांची निंदा कधीही करू नका. तुम्ही आपापसात भाऊ-बहीणच नाही तर तुम्ही माझ्या शरीराचे विविध अंग आहात. समजा माझ्या एका बोटाने दुसऱ्या बोटाची निंदा केली तर काय फायदा होणार आहे? यामुळे नुकसानच होणार आहे. यासाठी बरोबर हे आहे की मनुष्याला...... ह्यासाठी योग्य गोष्ट अशी की आपण हा विचार केला पाहिजे की आता आपण मनुष्य नाही आहोत. आपण अतिमानव आहोत आणि अतिमानवाची जी स्थिती आहे त्यातही आपले चित्त सगळीकडे फिरवून परमेश्वरावरच केंद्रित केले पाहिजे. ही गोष्ट सहजयोगात कठीण जाते. सुरुवातीला माहीत नाही की का मनुष्य सामूहिकता तोडतो. ही

पण एक असुरी विद्या आहे. जिथे सामूहिकता तुटते. आता जसे मी म्हणू शकते की मुंबईत ही गोष्ट कमी आहे, दिल्लीत अजून नाही पण कलकत्त्यात काय हाल आहे मला माहीत नाही. पण मी हेच सांगेन की हा आजार पसरू देऊ नका. तुम्ही सर्व लोक माझी मुलं-मुली आहात. आपापसात कोणताही मतभेद होवो, तरी काही नाही पण तुम्ही आपापसात गटबाजी करू नका. मग एक समूह बनेल. त्या समूहातील म्हणतील आमच्या माणसाला पुढे करा. दुसरा म्हणेल आमच्या माणसाला पुढे करा. आणि त्याचा परिणाम काय होईल? तुम्ही बघताच असे लोक सहजयोगापासून बाजूला केले जातात. त्यांचे स्थान संपून जाते. जसे गुरूंना संपवले जाते. तसेच याप्रकारच्या लोकांना नष्ट केले जाते. मी हे कार्य केले नाही तर निसर्गच ते कार्य करेल. म्हणून तुम्हाला खास करून सांगायचे आहे की, तुम्ही आपले चित्त आपल्याकडेच द्या आणि दुसऱ्यांना प्रेम द्या. दुसऱ्यांना प्रेम द्या आणि आपल्याकडेच चित्त ठेवा. आपल्याकडे बघा. आपल्याकडे बघा आणि म्हणा की, 'मी कसा आहे? मी ठीक आहे का? आपली चक्रं ठीक आहेत? आपल्यामध्ये काही दोष आहे?' जर तुम्हाला असे वाटत असेल, की कोणाला हे सर्व समजते तर त्याला जाऊन विचारा की, 'जर कोणते चक्र पकडत असेल तर सांगा. आम्हाला हे समजत नाही.' जेव्हा तुम्ही या गोष्टीचा स्वीकार कराल की तुम्ही आईच्या विविध अंगात बसले आहात तर तुम्हाला समजेल, की आपले किती महत्त्व आहे. तुम्ही कसेही असाल, मी तुमचा स्वीकार केला आहे. तुम्हाला पण मला स्वीकारावे लागेल आणि जाणून घ्यावे लागेल की अत्यंत शुद्ध आणि पवित्र भावनेने तुम्ही राहिलात तर तुमच्या आईला किती सुख आणि आनंद मिळू शकेल.

आज विशेष स्थिती आहे, या स्थितीत अभियानाला सुरुवात होत आहे. ह्या संपूर्ण विश्वात जेवढे तांत्रिक आहेत, त्या लोकांच्या मागे मी आता पडणार आहे. माझी अशी इच्छा आहे की, तुम्ही पण ह्या लोकांच्या मागे हात धुवून लागा. जिथे कुठे तांत्रिक तुम्हाला दिसतील त्यांच्याकडे जाणाऱ्या लोकांसाठी काहीतरी हँडबिल्स वगैरे छापून त्यांना तिथे द्या आणि त्यांना सांगा की, हे तांत्रिक लोक आहेत आणि ह्यांच्यापासून दूर व्हा. जी व्यक्ती तांत्रिकाकडे जाते किंवा त्याच्या घरी हे तांत्रिक येतात अशा लोकांची सात पिढ्या प्रगती होत नाही. त्यांच्या मुलांमध्ये काही प्रगती होत नाही. सात पिढ्यांपर्यंत त्यांची अवस्था खराब राहते. मोठमोठे नुकसान होते. त्याचे घरच कुठे जळून जाईल, त्याची बायकोच कुठे आत्महत्या करेल. त्याच्या घरात नेहमीच दु:ख, काही न् काही वाईट गोष्टी होत राहतील. कोणत्या ना कोणत्या तरी समस्या त्यांच्यासमोर उभ्या राहतील. तेव्हा आजचे जे अभियान आहे त्याची ही खासियत ज्याला लोक 'एप्रिल फूल' म्हटले जाते. अशांना मूर्ख बनवूनच धोपटले जाईल. अगदी मूर्ख बनवूनच धोपटले जाईल कारण हे लोक (तांत्रिक) स्वत:ला जास्तच शहाणे समजतात. तेव्हा त्यांचा हा मूर्खपणा उघडकीस आणणे हे तुमचे काम आहे. तुम्हा सर्वांचा हा त्याग आणि तुमचे हे जे प्रेम आणि ही जी शोभा आणली आहे...... इतका खर्च तुम्ही लोकांनी केला आहे, तेवढा खर्च करायची जरुरी नाही. तुम्ही सर्व लोक जसे आहात, जे काही तुम्ही द्याल तेच खूप आहे. मला तर काही नको पण! तुम्हाला माझ्याकडून जे काही हवे असेल. ते तुम्ही माझ्याकडून घ्या. तुमच्या आनंदासाठी म्हणून मी सांगू इच्छिते, 'अरे बाबा, द्या तुम्हाला साडी द्यायची तर. काय करू शकते?' परंतु तुम्ही चार वर्ष आधी दिलेल्या साड्या कुलुपात पडल्या आहेत. मला समजत नाही जेव्हा कधी म्युझियम वगैरे बनेल तेव्हा त्यावेळी ह्या साड्या लावून द्या. ह्या सर्व गोष्टी तुमच्या इच्छेसाठी, आवडीसाठी. तुम्ही म्हणाल तसे माझ्याकडे एक ठेव (अमानत) म्हणून राहील. त्याची काही खरंतर काही जरूर नाही. त्याच्यापुढे मी काही बोलू शकत नाही. काहीच नाही. जे काही आहे ते प्रेमाने द्या. मग ती शबरीची बोरं असो किंवा तुम्ही दिलेल्या साड्या असोत मला सर्व मान्य आहे.

तेव्हा आपली आता पूजेची वेळ होत आली आहे. आज जसे मी म्हटले होते की, आज वाढदिवस आहे. बरोबर बारा वाजता मी भाषण द्यायला सुरुवात केली आणि बरोबर बारा वाजता माझा जन्म झाला. त्यामुळे एवढा वेळ लागला. फुलांमध्ये वेळ लागला. घाबरायचे काही कारण नाही. संयोगाची गोष्ट ही आहे की, बारा वाजता जन्मदिवस साजरा करायचा होता. तेव्हा सर्व गोष्टी त्या वेळेत बरोबर झाल्या आहेत. आपण कोणालाही दोषी ठरवत नाही.

आपापसात कोणताही मतभेद होवो तरी काही नाही

पण तुम्ही आपापसात गटबाजी करू नका.



# विशुद्धी तत्त्व

आपणातील सद्‌गुरुतत्त्वास नमस्कार करून आपणातील श्रीकृष्ण शक्तीबद्दल आता मी सांगते.

मानवात सुरुवातीपासूनच श्रीकृष्ण शक्ती स्थित आहे. ज्यावेळेस मनुष्याने त्याची मान उंच केली त्यावेळेपासूनच त्याच्यामध्ये हे चक्र स्थापित झाले. ज्याला आपण विशुद्धी चक्र म्हणतो. या चक्रास १६ पाकळ्या आहेत. हे चक्र  आपल्या मागील बाजूस मानेच्या ठिकाणी स्थित आहे. मनुष्याने आपली मान उंचावली आणि सरळ केली तिथे कृष्णशक्ती जागृत झाली. कृष्णशक्तीमुळेच आपल्या उत्क्रांतीस परिपूर्णता आली असे म्हणता येईल. उत्क्रांतीचा इतिहास पाहिल्यास, प्रथम आपण एकपेशी अमीबा होतो, त्यानंतर मासा, कासव असे होत होत राम, रामानंतर कृष्णापर्यंत येऊन पोहोचलो आहोत. श्रीकृष्ण शक्ती ही संपूर्ण शक्ती आहे. ज्यावेळेस आपणामधील श्रीकृष्ण शक्ती जागृत होते त्यावेळेस आपला संबंध विराटाशी येतो. याला समष्टी व यष्टी असे म्हणतात. त्या समष्टीमध्ये तुम्ही सामावून जाता. याचा अर्थ जर आपण माझ्याकडे किंवा माझ्या फोटोकडे दोन्ही हात फैलावून बसलात तर श्रीकृष्ण शक्ती जागृत होऊन आपण विराटाशी संबंधित होता. विराटाची जी शक्ती आहे तिला विराटांगना म्हणतात. आपल्या हातामध्ये ही श्रीकृष्णाची विराटशक्ती आहे ती सर्वत्र पसरली आहे. ज्यावेळेस आपल्याला ही शक्ती मिळते, जेव्हा आपण श्रीकृष्ण शक्ती मिळवतो, त्यावेळेस आपणामध्ये साक्षित्व येते. याचा अर्थ आपण कोणत्याही गोष्टीकडे एखाद्या नाटकाप्रमाणे पाहतो. वास्तविकपणे हे सर्व एक नाटकच, एक लीलाच आहे. श्रीकृष्णांनी त्यावेळी केलेल्या लीला किंवा प्रभू श्रीरामचंद्रांनी त्यावेळेस जे केले ते सर्व नाटकच होते. ते त्यात संपूर्णपणे समरस झाले होते. परंतु श्रीकृष्णांनी फक्त  लीलाच केल्या म्हणून त्यांना पूर्णावतार म्हणतात. ज्यावेळेस मानवातसुद्धा पूर्णत्व येते, त्यावेळेस तो विश्वाकडे नाटक पहावे त्या दृष्टीने पाहतो. जसे लोक वेड्यासारखे उड्या मारत आहेत. यात तो रमत नाही. त्याने तो दु:खीही होत नाही. यात तो सुखीही होत नाही. तो आनंदात समरस झालेला असतो. हे श्रीकृष्ण शक्तीमुळे होते.

श्रीकृष्ण शक्तीची खालीलप्रमाणे दोन अंगे आहेत. एक डावे आणि उजवे व एक मध्य. यातील जी शक्ती मधोमध आहे ती विराटाकडे घेऊन जाते. जी डावीकडील शक्ती आहे ती शक्ती मनुष्याच्या मनातील एखादी चूक किंवा चुकीचे किंवा खोटे कार्य केल्यानंतर निर्माण होणाऱ्या भावनांमुळे खराब होत असते. ज्यावेळेस एखाद्या माणसाला असे वाटते की, 'मी फार पाप केले आहे किंवा चूक केली आहे. मला असे करायला नको होते.' ही फॅशन आजकल तिकडे खूप आहे. जेव्हा तुम्ही विकसित होता, खूप जास्त विकास होतो तेव्हा तुमच्यामध्ये या गोष्टी स्थिर होतात. पहिले तर तुम्ही अतिमध्ये जाता आणि 'मी हे आहे, मी तो आहे. मला पुढे प्रगती करायची आहे.' जिकडे तुमच्या देशाचा विकास होत आहे. आणि जेव्हा उतरू लागता जसे वेस्टर्न कंट्रीज मध्ये हे सुरू झाले आहे, की ज्याला बघावे तो सकाळ-संध्याकाळ रडत बसतो. मी विचारले, 'काय झाले?' तर सांगू लागले की, 'मी खूप पाप केले आहे. माताजी, मी हे केले आहे.' मी सांगितले, 'अरे, सोडा या सर्व गोष्टी. सध्या तर पार व्हा.' या गोष्टीवर ते रडू लागले. त्यांचे रात्रंदिवस रडणे ऐकून मनुष्य त्रासून जातो. इतके रडतात की ते म्हणतात, 'आमच्या पूर्वजांनी हिंदुस्थानसारख्या योगभूमीवर आक्रमण केले होते.' आजकालचे तिथले नवयुवक जे

**२५ सप्टेंबर १९७९, मुंबई**

आहेत ते खूप वेगळ्याप्रकारचे आहेत. ज्या युवकांना आम्ही पहिले पाहिले होते ते वेगळे होते, हे वेगळे आहेत. जेव्हा हे डाव्या बाजूकडे जाऊ लागतात विशेषत: यामध्ये मनुष्य मादक वस्तू घेऊ लागतो कारण त्याला असे वाटते की, 'मी या चुका केल्या. मी त्या चुका केल्या. मी हे पाप केले. खोटे बोललो. मला असे करायला नको होते.' यामुळे मनुष्य मादक पदार्थ घेऊ लागतो. ह्यापैकी आपल्या येथे एक वस्तू फार प्रामुख्याने लोक वापरताना आपणास आढळते, ती म्हणजे सिगरेट व विडी त्यानंतर तंबाखू खाणे. तंबाखू खाणे हे श्रीकृष्ण शक्तीच्या विरोधात आहे. परंतु आपणास आश्चर्य वाटेल की, ज्या लोकांना अशा सवयी पूर्वी होत्या त्यांच्या सवयी सहजयोगात आल्यानंतर, पार झाल्यानंतर आपोआप सुटल्या.

एक साहेब होते ज्यांनी तंबाखू सोडली नव्हती. त्यांनी त्यांची इच्छाशक्ती वाढवली नाही आणि तंबाखू सोडू शकले नाहीत. कधीकधी चोरून ते तंबाखू खात असत. एक दिवस माझ्याकडे येऊन सांगू लागले की, 'माताजी, जेव्हा मी ध्यान करायला बसतो तेव्हा माझे तोंड फुलू लागते. वाकडेतिकडे होते. मी काय करू हे मला समजत नाही.' मी म्हटले की, 'मला माहीत आहे काय आहे ते. तुम्ही तुमची तंबाखू सोडा. आज वचन द्या की तुम्ही तंबाखू सोडाल.' त्यानंतर त्यांचे डाव्या बाजूचे चक्र जे आहे ते उघडले आणि त्यांची कुंडलिनी व्यवस्थित चालू लागली. तुम्ही पाहिले असेलच की परदेशात लोक अहंकारी आहेत. पहिल्यांदा खूप अहंकाराने बोलले. युद्ध केले. जगातील कित्येक लोकांना मारले आणि आपले साम्राज्य पसरवले. सर्वकाही केले. आता एका सीमेपर्यंत पोहोचले आणि तिथून जेव्हा पेन्ड्यूलम चालले तेव्हा दुसऱ्या सीमेपर्यंत पोहोचले आणि तिथे जाऊन बघितले की, 'बाप रे! आता आम्ही काय करू? आम्ही कसे करू? काय करू? आम्ही इतके वाईट, तितके वाईट.' हे सर्व बघितल्यांनतर चालले दारू प्यायला. दारू नाही तर तंबाखू खा. नाही तर तिथून पळून जायला सुरुवात केली. तंबाखू ही गोष्ट परमेश्वराने खाण्यासाठी बनविली नाही. माणसाची अक्कल इतकीच आहे त्याला काय करणार? परमेश्वराने तंबाखू किटकांना मारण्यासाठी, जंतुनाशक म्हणून बनविली. तुम्ही लोकांनी माहीत नाही याला कुठून जाळले आणि तंबाखू करणे सुरू केले परंतु तंबाखू खूप हानीकारक आहे आणि तंबाखूमुळे आपले गुरूतत्त्वसुद्धा बिघडते कारण खाल्लेली तंबाखू पोटात जाते व तेथून यकृत इत्यादी अवयवांना खराब करते. गुरूतत्त्व आपल्या सागरात भरलेले आहे. हा जो सागर आहेत तो आपला गुरू आहे. **जेव्हा आपण कधी गुरूतत्त्वाच्या विरोधात जातो तेव्हा सागर खराब होतो आणि सर्व नष्ट करायला सुरुवात करतो.**

मी एकदा गुंटूरमध्ये गेले होते, आंध्रचे लोक होते. मी त्यांना सांगितले की, 'तुम्ही इथे कृपा करून तंबाखू लावू नका.' ते सांगू लागले की, 'आम्ही आपल्या देशात ती देत नाही. ती सगळी बाहेर पाठवतो.' मी त्यांना सांगितले की, 'तुमच्या देशातले. इथे आंध्रमधील जी गरीब जनता आहे ती हे खाते आणि काळी जादू करते. आणि तुम्ही लोक ही तंबाखू एक्सपोर्ट करून वाईट गोष्टींचे भागीदार बनत आहात.' तर ते सांगू लागले की, 'नाही, नाही माताजी, याच्याशिवाय तर आम्ही मरून जाऊ.' मी त्यांना सांगितले की, 'कोणी मरणार नाही. तुम्ही इथे कापूस लावा आणि कापसामुळे सर्व ठीक होईल.' त्यांच्यातील काहींनी सांगितले की, 'ठीक आहे माताजी, आम्ही कापूस लावू. आम्ही कापसाची सुरुवात करू.' आणि त्यानंतर त्यांचा व्यवसाय खूप वाढला. परंतु त्यांना दोन-तीन वेळा सांगावे लागले. एक दिवस ते खूप वाद घालू लागले. मी त्यांना सांगितले की, 'खबरदार, आता जास्त चर्चा करू नका. तुम्ही असे जर काही केले तर हा समुद्र तुमच्यावर नाराज होईल.' तुम्हाला तर माहितीच आहे, की त्यानंतर आंध्रमध्ये खूप जोरदार वादळ झाले आणि कितीतरी लोक नष्ट झाले आणि त्यांना कळलेच नाही की ते कोठे राहत होते. नेहमी तुम्ही बघितले असेलच की समुद्रात जोराचे वादळ आले की लोकांचा त्या वादळात नाश होतो. कोणाला काही सांगा की, 'तंबाखू लावणे बंद करा, ही अशुभ गोष्ट आहे.' तर कोणी ऐकणार नाही.

आता तिथली संपूर्ण जमीन खारट झाली आहे, तिथे आता तंबाखू लावू शकत नाही. कोणत्याही प्रकारे तंबाखूचे पीक वाढू शकणार नाही. आता ते आपल्या नशिबावर रडत आहेत. तिथल्या सर्व भागात तंबाखू लागते आणि तिथे मोठ-मोठी वादळे येतात. ज्यादिवशी लोकांना हे समजेल, की तंबाखू लावण्याने आणि काळी जादू करण्याने समुद्र आपल्यावर नाराज होतो, त्यादिवशी त्यांना हे ही समजेल, की परमेश्वराचा आपल्यावर किती आशीर्वाद आहे. आपल्याजवळ किती सुंदर जमीन आहे, त्याचा उपयोग चांगल्या गोष्टींसाठी करा. परंतु मनुष्य छोट्या गोष्टींमध्ये समाधानी नसतो. त्याला वाटत असते की जगात जितकी संपत्ती आहे ती मीच घेऊ.

**'जेव्हा आपण कधी गुरुतत्त्वाच्या विरोधात जातो तेव्हा सागर खराब होतो आणि सर्व नष्ट करायला सुरुवात करतो.'**

# तंबाखू खूप हानीकारक आहे आणि तंबाखूमुळे आपले गुरुतत्त्वसुद्धा बिघडते

परंतु त्याला हे समजत नाही की, ज्याच्याजवळ खूप संपत्ती आहे तो कुठे सुखी आहे! तो कुठे आनंदी आहे!

डाव्या बाजूची ही जी शक्ती आहे जिला आपण विष्णुमायेची शक्ती म्हणतो, ही शक्ती बहिणीची आहे. श्रीकृष्णाच्या बहिणीची. श्रीकृष्णाची बहीण जी मारली जात असताना आकाशात उडून गेली व जिने आकाशवाणी केली होती की तुला मारणारा हत्यारा अजून जिवंत आहे. तीच ही विष्णुमाया शक्ती. ही बहिणीच्या नात्याची गोष्ट आहे. जर तुमची बहीण फार आजारी असेल तर तुमचे हे चक्र पकडेल. जर तुमच्या बहिणीला काही त्रास असेल तर तुमचे हे चक्र पकडेल. जर एखाद्या माणसाची दृष्टी आपल्या बहिणीप्रती किंवा इतर महिलांप्रती योग्य किंवा पवित्र नसल्यास हे चक्र लगेच बिघडते. आजकालच्या समाजात अनेकांचे हे चक्र खराब असल्याचे आढळते. कारण की, त्यांची दृष्टी पवित्र नसते. आपल्या पुरातन शास्त्रात सांगितल्याप्रमाणे आपल्या पत्नीशिवाय इतर सर्व महिलांना बहिणीप्रमाणेच वागवले पाहिजे. असे सांगितले की लोक हसतात, 'हे कसे होऊ शकते. माताजी असे होऊ शकत नाही.' कारण सर्व लोक कुत्र्यासारखे झाले आहेत ना? कुत्र्यांना या गोष्टी समजत नाही की अशाप्रकारचे ही पावित्र्य असते. तुम्ही करून बघा की, तुम्ही स्वत:ची सोडून इतर सर्व स्त्रियांना बहीण, आई माना. बघा, आपणास किती संतोष मिळेल. आपले कित्येक त्रास नाहीसे होतील. किती समजुतदार बनाल. बघा, पूर्वी लोक घरी येत, रहात तेव्हा कोणत्याही प्रकारच्या समस्या येत नव्हत्या. विशेषत: परदेशात बघा, आमचे एक शिष्य आहेत ज्यांचे वय २६ वर्ष आहे आणि त्यांच्या आईचे वय साधारण ४२-४३ वर्ष होते. त्यांच्या घरी त्यांचे एक मित्र रहायला आले, तर त्यांची आई त्या मित्राबरोबरच पळून गेली. कोणत्याही प्रकारचे सेंस ऑफ प्रपोर्शन नाही. विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, मुलाचा मित्र घरी रहायला आला आणि त्याची आई त्याच्याबरोबरच पळून गेली. आत्ताच आम्ही एक लेख वाचला की जे वाचून तुम्ही हैराण व्हाल की १७ वर्षाच्या मुलाने आपल्या आईबरोबरच लग्न केले आणि आता कोर्टात जाऊन आमचे हे लग्न स्वीकारले गेले पाहिजे म्हणून भांडत आहेत.

ही सगळी डाव्या बाजूची अपवित्रता आहे. सध्या त्या सिनेमावाल्यांमुळे लोकांवर फार परिणाम होतो. या सर्वांना आपल्या केलेल्या अशा अपवित्र कर्मांची फळे भोगावी लागणार आहेत. या अपवित्रपणामुळे आपले चेहरे बघितले आहेत का कसे झाले आहेत? त्यामध्ये भोळेपणा नाही, काही तेज दिसत नाही. कित्येकांचे डोळे गरगर फिरत असतात. हे डोळे फिरवणे म्हणजे सुद्धा श्रीकृष्णशक्तीच्या विरोधात कार्य. डोळे फिरवण्याने आपल्याला आनंद तर नाहीच मिळत, पण आपल्या डावीकडील संस्थेत भुतांचे आगमन होत असते. तुम्हाला माहीत नाही की, डाव्या बाजूने जर तुमच्यामध्ये भूत घुसले तर तुम्ही डोळे फिरवण्याशिवाय काही करू शकत नाही. डोळे इकडून तिकडे फिरत राहतात. याला बघतात, त्याला बघतात आणि त्यामुळे डावीकडे विशुद्धी चक्रावर पकड येते. त्यामुळे तुमच्यामध्ये अपराधीपणाची भावना निर्माण होते. तुम्ही कधीही सुखी होऊ शकत नाही. आमच्या लहानपणी आम्हाला आई-वडील सांगत असत की, खाली मान घालून नजर जमिनीवर ठेवून चाला.

आपणास कदाचित माहीत असेल की, श्री लक्ष्मणानी श्री सीतामाईचे पायच पाहिले आहेत. त्यावर कधी त्यांनी नजर उचलली नव्हती. यात त्यांचा काही वाईट उद्देश नव्हता किंवा ते काही



दुष्ट किंवा वाईट व्यक्ती नव्हते. ही एक शिस्त होती, की नजर जमिनीवर ठेवून चालणे. जी मंडळी नजर खाली करून चालतात ती बादशाही वृत्तीची असतात. जे भिकारी किंवा भुतासारखे असतात ते आपली नजर सारखी फिरवीत चालतात. जी व्यक्ती स्वत:च्याच दिमाखात, प्रतिष्ठेत असते त्यांना दुसऱ्यांकडे लक्ष देण्याची गरजच पडत नाही. तुम्हाला हे समजले पाहिजे की, ज्यावेळी तुम्ही दुसऱ्यांकडे बघता तेव्हा त्यांच्यातील गुण, त्यांच्यातील वाईट गोष्टी तुमच्यामध्ये येतात.त्यांच्यामध्ये असलेले जे जे कंडिशनिंग आहे ते तुमच्यामध्ये येते. हा डोळे फिरवण्याचा रोग आज इतका पसरला आहे की, त्यामुळे डोळ्यांचे रोग पसरत आहेत. लोकांची नजर कमजोर होते. डोळे खूप त्रास द्यायला लागतात. त्यावेळेस मग हिरवळीवर चालण्यास सांगण्यात येते. अनवाणी पृथ्वीमातेवर चालण्यास सांगण्यात येते, कारण की, ती (पृथ्वीमाता) आपली आई आहे. एकदा आई काय आहे हे समजल्यावर लोकांना बहीण काय आहे हे समजू शकेल. जोपर्यंत तुम्ही तुमच्या आईला समजू शकत नाही तोपर्यंत तुम्ही बहिणीला समजू शकणार नाही. तात्पर्य आपण आपली नजर खाली ठेवून चालणे आवश्यक आहे व कोणाकडेही अपवित्र दृष्टीने पाहू नये, हे पाप आहे. हीच गोष्ट आपल्याकडील अनेक सद्गुरूंनी सांगितली आहे. श्री येशू ख्रिस्तांनी सांगितले आहे की, 'तुमची नजर व्यभिचारी नसावी. व्यभिचारी डोळे हे राक्षसासारखे असतात.' पावित्र्यापर्यंत त्यांनी तुम्हाला पोहोचवले आहे आणि त्यांना तुमच्याकडून आशा आहे. परंतु आजकालच्या जगात जर अशा गोष्टी सांगितल्या तर लोकांना ते आवडत नाही. परंतु तुम्ही तुमच्या वागण्यात प्रयत्न करून बघा,

‘सध्या त्या सिनेमावाल्यांमुळे लोकांवर फार परिणाम होतो. या सर्वांना आपल्या केलेल्या अशा अपवित्र कर्मांची फळे भोगावी लागणार आहेत.’

तुम्हाला सर्वांचेच जीवन सरळ आणि सौंदर्यपूर्ण भासू लागेल. आता आजकालची गाणीच बघा. स्त्रियांना बसवून गाणी म्हणून घेण्याची पद्धत म्हणजे अतिशय हीन प्रकार आहे. अशाप्रकारे स्वत:ला इतके खालच्या दर्जाचे करणे मला समजत नाही. खास करून आमच्याकडील मध्यमवर्गीयातील लोकांनी ह्या गोष्टी फार समजणे आवश्यक आहे, कारण की ज्यांच्याजवळ पुष्कळ पैसा आहे, त्यांच्या डोक्यात वरील गोष्टी सहजगत्या शिरणार नाहीत; कारण की ते त्यांच्या पैशाच्या मस्तीत चूर असतील, त्यांना पाप-पुण्याचा विचार करण्यास वेळ नाही.

माणसाला पाप-पुण्याचा विचार विशुद्धी चक्रामुळे येतो. जर पाप-पुण्याचा विचार नसेल तर आपली कुंडलिनी जागृत होणार नाही. विश्वात पाप-पुण्य दोन्ही गोष्टी आहेत. परंतु काहीजण असा विचार करतात की, ‘माताजी, हा इतका पापी माणूस असून त्याची बघा किती प्रगती झाली आहे.’ मी त्यांना सांगितले की, ‘तुम्ही त्यांच्या घरी जाऊन बघा काय चालू आहे ते. त्याच्या जीवनात बघा त्याची काय प्रगती झाली आहे? त्या माणसाचा चेहरा थोडा तरी आनंदी दिसतो का? त्याचे नाव घेतले तरी लोक म्हणतात, बापरे! कोणाचे नाव घेता.’ ज्या मनुष्याच्या मागे कोणतीही व्यक्ती त्याला चांगले म्हणत नाही अशा चारित्र्यहीन, वाया गेलेल्या व्यक्तीचा आदर्श तुमच्यासमोर असेल तर तुमचेही काही खरे नाही. ज्यावेळेस आपण सहजयोगात येऊन पार होता त्यावेळी आपणात श्रीकृष्णशक्ती जागृत होते व आपण प्रतिष्ठित होता. आपण मुळात प्रतिष्ठित आहातच, पण पार होण्यापूर्वी आपणास त्याची जाणीव नसते.

आपणास माहीत नाही की परमेश्वराने किती परिश्रमाने एक-एक चक्र आपल्यामध्ये बनविले आहे. त्याला किती सौंदर्यपूर्वक बनवले आहे. त्याला कशाप्रकारे घडवले आहे आणि ह्या कुंडलिनीला कशा तऱ्हेने सुरक्षित ठेवले आहे. तुम्ही तुमचाच अपमान करीत आहात. स्वत:चे महत्त्व समजून घ्या. आपला मोठेपणा समजून घ्या व आपली स्थिती जाणून घ्या. आपण साऱ्या विश्वातील फुले आहात. आता फळात रूपांतर होण्याची वेळ आली आहे.

आपण हे समजून घ्या की, आपण परमेश्वराचे अंश आहोत. परमेश्वर आपल्याला मान देत आहे आणि आपणासमोर नतमस्तक होत आहे आणि आपणास विनवित आहे की, ‘आपण हे सर्व ज्ञान प्राप्त करून घ्या’ आपले श्रेय जाणून घेणे हे ही सुबुद्धीचेच काम आहे. जोपर्यंत त्याच्यामध्ये दुर्बुद्धी असते तोपर्यंत तो हे करू शकत नाही. सुबुद्धी विशुद्धी चक्रामुळे जागृत होते. ज्यावेळेस मनुष्याचे स्वत:चे विशुद्धी चक्र जागृत होते त्यावेळेस त्याच्यामध्ये आपोआपच सुबुद्धी येते. त्याच्यामध्ये संतुलन येते. एक असते सुबुद्धी व दुसरी दुर्बुद्धी. बुद्धीमुळे काही फरक पडणार नाही. बुद्धी गाढवासारखी असू शकते किंवा मूर्खासारखीसुद्धा. बुद्धीच्या तर्कामुळे एखादा मनुष्य चोरीसुद्धा करू शकतो. तो म्हणेल, ‘मी चोरी का करू नये? माझ्याजवळ अमुक गोष्ट नाही जी त्याच्याजवळ आहे. तर मी चोरी का करू नये?’ याचे कारण तर्कबुद्धी आहे. आता असे बघा की, तर्कबुद्धीमुळे मनुष्य प्रत्येक वस्तुकडे संयुक्तिक विचाराने पाहावयास लागतो. परंतु सुबुद्धीमुळे तसे होत नाही. सुबुद्धीमुळे ‘आपली व दुसऱ्याची वस्तू ही प्रत्येकाची स्वत:ची आहे हे लक्षात येईल. आणि माझ्या वस्तूत जो आनंद आहे, तो इतरांच्या वस्तूमध्ये नाही.’ वास्तविक कोणतीच गोष्ट कोणाची नाही. आपल्याला सर्व गोष्टी येथेच सोडून जायचे आहे. हा तर सर्व विचारांचा जमाखर्च आहे की ही माझी वस्तू व ती त्याची. एक फारच सर्वसाधारण बाब आहे की, सर्व गोष्टी येथेच सोडून मनुष्याला जावयाचे आहे, मग त्याच्यामागे एवढी धावपळ कसली?

## विशुद्धी तत्व ....

आता उजवीकडील विशुद्धी चक्राबाबत पाहू या. हे श्रीकृष्ण आणि राधा यांच्या शक्तीपासून बनलेले आहे. ह्या शक्तीच्या विरोधात ज्यावेळेस मनुष्य जातो त्यावेळेस त्याची वृत्ती अशा प्रकारची असते की, जेव्हा तो म्हणेल की, मी फार मोठा आहे, मी राजा आहे, मी फार मोठा पुढारी आहे आणि मीच सर्व काही आहे. अशा वृत्तीमुळे त्या माणसात कंसरूपी अहंकार बळावतो की, कशाप्रकारे मी सर्वांवर राज्य करेन. त्याला जगातील कोणतीच गोष्ट दिसत नाही. त्याला उजवीकडील विशुद्धी चक्राची पकड असते परंतु आपणामध्ये सर्वांत प्रथम सर्दीमुळे उजव्या विशुद्धीवर पकड येते. सर्वजण म्हणतात की सर्दी, खोकल्यावर तुळस सर्वात चांगली आहे. याचे कारण म्हणजे तुळशीची डावीकडील जी शक्ती आहे ती उजव्या बाजूचे संतुलन करते. सर्दी होणे ही काही चिंताजनक गोष्ट नाही पण आपल्या सहजयोगात सर्दी-तापावरची व्यवस्था खूप चांगली आहे आणि तुम्ही हे समजून घ्या की तुमचे सर्वसाधारण ताप, सायनस सारख्या समस्या ठीक होऊ शकतात.

आता विशुद्धी चक्राच्या मधोमध जी शक्ती आहे ती विराटाची शक्ती आहे. ही सर्वात महत्त्वाची आहे. या शक्तीमुळे मानव परमेश्वराच्या शोधात असतो तर परमेश्वराला शोधण्याचा अर्थ काय? तो हे शोधत असतो की जर मी विराटाचाच एक भाग आहे तर मी त्याला शोधेन ज्याचा मी अंश आहे. ह्याचाच अर्थ जोपर्यंत आपणामध्ये सामूहिक चेतना येत नाही, तोपर्यंत आपणास त्याचे उत्तर मिळणार नाही. नुसते लोकांना भाऊ-बहीण मानून सामूहिकता मिळणार नाही. पण हे सामूहिक चेतनेत आपोआप घटीत होते. जोपर्यंत आपणही सहजयोगात येऊन आपली कुंडलिनी शक्ती जागृत होत नाही, तोपर्यंत आपली सामूहिक चेतना जागृत होत नाही. एकदा आपली कुंडलिनी शक्ती जागृत होऊन आपण पार झालात की, आपण इतरांच्यातील भावना, जाणिवा इ. स्वत:मध्ये जाणू शकता. हे आपल्यातील सामूहिक चेतना जागृत झाल्यामुळे शक्य होते. आपण स्वत:कडे अंतर्मुख होऊन पाहू शकतो व आपली दृष्टी पूर्णतेकडे वळते. इतर गोष्टींकडे आपण पूर्णतेच्या तुलनेने पाहू लागतो. आपली आंतरिक स्थिती काय आहे हे तंतोतंत जाणू शकता. आता सोप्या भाषेत सांगायचे तर आपल्या हाताची पाच बोटे, त्यावर आपण आपल्या शरीरातील सात च्रकांची जाणीव घेऊ शकता. ही सातही चक्र डाव्या सिम्पथॅटिक व उजव्या सिम्पथॅटिक वर जागृत होतात. जेव्हा ही जागृत होतात तेव्हा काय जाणवू लागते? समजा तुमच्यासमोर कोणी हात पसरवून उभे आहे, तर मी लगेचच सांगेन की त्याला काय आजार आहे. मला हे कसे समजते? समजा माझ्या उजव्या बाजूच्या या बोटात चमक आली किंवा गरम लागले तर मला असे समजेल की याचे यकृत खराब आहे कारण हे उजव्या बाजूचे नाभी चक्राचे स्थान आहे आणि नाभी चक्रावर यकृताचे स्थान आहे. त्यानंतर छोट्या, छोट्या फ्रिक्वेंसी ही मनुष्य पकडू लागतो. एवढेच नाही तर जेव्हा मनुष्य सहजयोगात पुढे जातो तेव्हा त्याच्या मनात अशाच भावना येतात जशा समोरच्या व्यक्तीच्या असतील. जर तुम्ही त्याला विचारले की 'तुमचे यकृत खराब आहे का?' तर तो सांगेल की 'हो, आहे.' तुम्ही तुमचे हात असे घासा. तुमचे यकृत ठीक होईल व त्याचेही यकृत ठीक होईल. जर एखाद्या व्यक्तीला डोकेदुखी असेल तर तुमचेही डोके जड होईल. तुम्ही विचाराल की, 'डोके दुखते का?' तर तो म्हणेल, 'हो.' त्यानंतर तो आपले डोके अशाप्रकारे दाबून डोकेदुखी ठीक करेल. त्यामुळे त्या दुसऱ्या व्यक्तीचीही डोकेदुखी ठीक होईल.

आपल्यामध्ये सामूहिक चेतना जी येते ती सब्जेक्टिव्हिटी आहे. ही खरोखरच येते. ही फक्त सांगायची गोष्ट नाही, तर ती होऊनच जाते. तुमची जी चेतना आहे ती या स्तरापर्यंत येते. एक नवे आयाम त्याच्यामध्ये येते. ज्यामध्ये तुम्ही सामूहिकरीत्या चैतन्यित होता. बरेच लोक वरून हुशार वाटतात, परंतु आतून वेडे असतात. त्यांच्याजवळ गेलात तर तुम्हाला दोन थप्पड मारतील. परंतु जर तुम्ही आत्मसाक्षात्कारी आत्मे असाल तर तुम्हाला समजेल की ही व्यक्ती वेडसर आहे. जर उजव्या बाजूचे कोणते ना कोणते चक्र पकडले तर त्या व्यक्तीमध्ये कोणती ना कोणती मानसिक विकृती येतेच. कोणी उजव्या बाजूकडून येते, कोणी डाव्या बाजूकडून येते ते शारीरिक आणि भावनिक असतात. ते आपल्या विशुद्धी चक्राशी जोडले आहे. आमच्याकडे सहजयोगात बरीचशी मंडळी येतात व पार होतात. पण ह्यापैकी कित्येकांना चैतन्य लहरींची जाणीव होऊ शकत नाही. ह्याचे कारण त्यांच्या विशुद्धी चक्रावर असलेला त्रास हे होय. या आधी विशुद्धी चक्र सिगरेट किंवा विडी इ. ओढण्याने खराब होते हे सांगितलेच आहे. शहरातील वातावरणात अशुद्धता जास्त असल्यामुळे सिगरेट किंवा विडी न ओढतासुद्धा हे चक्र खराब होऊ शकते.

विशुद्धी चक्र खराब झाल्यामुळे या चक्रामधून मेंदूकडे दुतर्फा संवेदना वाहून नेणाऱ्या नाड्या बिघडतात व त्यामुळे अशा

**'सुबुद्धी विशुद्धी चक्रामुळे जागृत होते.'**

‘आपल्या

महाराष्ट्रात

साधु-संतांनी

अवतार

घेऊन

ह्या

भूमीला

पावन

केले

आहे.’



# विशुद्धी तत्व ....

माणसाची संवेदन क्षमता कमी होते. परंतु जसजसे विशुद्धी चक्र जागृत होत जाते तसतशी संवेदन क्षमता वृद्धिंगत होते. विशुद्धी चक्र जागृत करण्यासाठीसुद्धा काही मंत्र आहेत. आपणास आश्चर्य वाटेल की, विशुद्धी चक्र स्वच्छ करण्यासाठी किंवा जागृत करण्यासाठी आपले अनामिकेची बोटे दोन्ही कानात घालून मान मागे करून व नजर आकाशाकडे करून मोठ्याने व आदराने 'अल्लाह-हो-अकबर' हा मंत्र तीन वेळा बोलण्याने, विशुद्धी चक्र स्वच्छ होते. तेव्हा आपण समजले पाहिजे की, 'अकबर' म्हणजे विराट पुरुष परमेश्वर होय. श्री गुरूनानक साहेबांनीसुद्धा विराट परमेश्वराच्या अर्थात श्रीकृष्णाबद्दल गोष्टी त्यावेळी लोकांना सांगितल्या होत्या. परंतु अशी किती माणसे आहेत की त्यांनी सांगितलेल्या गोष्टींचे लोकांनी अनुकरण केले आहे? उदा. त्यांनी सांगितले होते की, दोन्ही हात नमाज पडतात त्याप्रमाणे पसरवून परमेश्वराची प्रार्थना केली पाहिजे व अशाप्रकारे हात पसरवून नमाज केल्याने कुंडलिनी शक्तीचे जागरण होते. जर ही गोष्ट कोणत्याही मनुष्याला सांगितली तर ते मला मारायलाच उठतील. श्री गुरूनानक साक्षात श्री दत्तात्रेयांचे अवतार होते आणि कुंडलिनी जागृतीबाबत जितके कार्य त्यांनी केले आहे, तितके पूर्वी कोणीही केले नाही. सैतानाला कसे काढले पाहिजे इ.बद्दल अनेक बारीक व अभिनव गोष्टी त्यांनी सांगितल्या आहेत. ज्यांचा वापर सहजयोगामध्ये बऱ्याच प्रमाणात आम्ही करतो. श्री आदि शंकराचार्यांनी तर अनेक सूक्ष्म गोष्टी लिहून ठेवल्या आहेत. ह्या सूक्ष्म गोष्टी आपण काटेकोरपणे आपल्या जीवनात अंगीकारल्यावर आपण सहजयोगात पूर्णपणे विरघळून जाऊ. आपल्या देशात साधूसंतांनी अवतार घेऊन अशा ज्ञानांचा उलगडा करून समाजात जागृती करून आपणावर अनेक उपकार केले आहेत.

विशेषकरून आपल्या महाराष्ट्रात साधूसंतांनी अवतार घेऊन ह्या भूमीला पावन केले आहे ह्या संतांची इतकी तपश्चर्या आहे की, त्यांच्या नुसत्या इशाऱ्यावर लोक पार होत असतात. मी जेव्हा सहजयोगाच्या प्रचारार्थ निरनिराळ्या खेडोपाडी जाते, त्यावेळी हजारो लोक येत असतात. परंतु शहरातील लोकांना येण्यास सवड नसते. कारण की, खेडोपाडीच्या लोकांना सत्याची ओळख आहे आणि अशीच माणसे सहजयोगात प्रतिष्ठित होतील. इथे येऱ्यागबाळ्याचे काम नव्हे. ज्या लोकांना स्वत:बद्दल आदर नाही, श्रद्धा नाही किंवा सत्याची आसक्ती नाही त्यांच्यासाठी सहजयोग नाही. सहजयोग मिळविण्यासाठी फार मोठे पंडित किंवा विद्वान असण्याची जरूर नाही. सहजयोग हा सर्वसाधारण मध्यम परिस्थितीतील माणसांसाठी आहे. त्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असावयास हवी असे नाही, परंतु माणसे हृदयाची भक्कम असावयास हवी. किंबहुना दिलदार स्वभावाची असावी अशा प्रकारची माणसे सहजयोगात प्रतिष्ठित होतात.

श्रीकृष्ण शक्तीबद्दल लिहिण्यास अनेक गोष्टी आहेत. त्यातील सर्व सोळा पाकळ्या उघडायला आणि सांगायला खूप गोष्टी पाहिजेत. आणि कुंडलिनी ही काय गोष्ट आहे हे तुम्हाला अजून माहीत नाही. तुम्ही पाहिले नाही आहे. ज्याला तुम्ही बघितले नाही, त्याला तुम्ही जाणवू शकता. त्याचे स्पंदन तुम्ही तुमच्या नजरेने बघू शकता. त्याचे चढणे तुम्ही बघू शकता. त्याचे भ्रमण तुम्ही बघू शकता. या गोष्टी वेगळ्या आहेत ज्या तुम्हाला माहीत नाही. तुम्ही टेलिव्हिजन लावा तुम्ही बघू शकता. इथे अनेक प्रकारचे संगीत कार्यक्रम होतात ते तुम्ही रेडियो लावून ऐकू शकता. अशाच प्रकारे ही वेगळी, परमेश्वराची शक्ती सर्वदूर विराजमान आहे. अणू-रेणू, सर्व गोष्टीत परमेश्वराची शक्ती भरलेली आहे. कुंडलिनी जर जागृत झाली, त्याची कॉर्ड जर मेन ला लागली तर त्या परमेश्वराशी संवाद सुरू होतो. नंतर तुम्हाला तुमच्याच हातावर जाणवू लागेल की, 'जगात परमेश्वर आहे?' तुमच्या हातातून थंड चैतन्य लहरी वाहू लागतील.

तुमच्याविषयी तुम्हाला प्रेम असायला हवे, आदर असायला हवा. कारण परमेश्वराने तुम्हाला तुमचे जीवन व्यर्थ होण्यासाठी बनवले नाही. कोणत्याही प्रकारे यासाठी बनवले नाही. जर तुमचे जीवन व्यर्थ झाले तर परमेश्वरालाही काही अर्थ राहणार नाही. या सृष्टीचाही काही अर्थ राहणार नाही. तुमच्याविषयी प्रेम, आदर ठेवून, पूर्ण आशेने आपण या कार्याशी जोडले जा. सर्वव्यापी परमेश्वराशी चैतन्य लहरींद्वारे संवाद करू शकता कारण की, ही परमेश्वरी शक्ती सर्व अणुरेणूत संचारलेली आहे.

**आपल्या सर्वांना अनंत आशीर्वाद!**



# सहज विवाह



५ ऑक्टोबर १९९८, कबेला, अनुवादित

हा अत्यंत आनंददायी तसेच शुभदिवस होता. या दिवसाचा आपण सर्वांनी आनंद घेतला. सर्व वर-वधू खूप प्रसन्न दिसत होते. हे सर्व बघून मला खूप आनंद होत आहे आणि मी मनापासून तुम्हा सर्वांना आशीर्वाद देते. मी फक्त इतकेच सांगेन की तुमच्या विवाहाला तुम्ही अत्यंत प्रेमपूर्वक तसेच यशस्वी बनवा, हे खूप आवश्यक आहे. उदाहरण म्हणून तुम्हाला सांगते की एका देशातील सहा-सात मुलींनी दुर्व्यवहार केला आणि घटस्फोट घेतला. या प्रकारच्या व्यवहारामुळे आम्ही त्या देशावर निर्बंध लादले आहे. कारण आम्हाला वाटले की या महिलांनी एकामागून एक इतके विवाह तोडले, असे त्यांच्या पोकळ अहंकारामुळे झाले असावे. हा आमचा अनुभव आहे. काही इतर देशही आहेत. जिथे 'सहज विवाहा'ची काही वाईट उदाहरणेही आहेत. मी त्यांना सांगितले की तुम्हाला लग्न करायचे नसेल तर नका करू.सहजयोगात तुम्ही स्वत:साठी किंवा पत्नीसाठी विवाह करत नाही तर सहजयोगासाठी विवाह करीत आहात. जेव्हा तुम्ही भांडता किंवा अशाप्रकारचा मूर्खपणा करता तेव्हा तुम्ही सहजयोगाचे नुकसान करीत असता. तुम्हाला एक-दुसऱ्याविषयीच्या प्रेमभावना आणि वैवाहिक जीवनाचा आनंद घ्यायला हवा. मी असे पाहिले आहे की काही लोक इतके मूर्ख आहेत की त्यांना वैवाहिक जीवनाचा आनंद काय असतो? हे ही माहीत नाही. तुम्ही जर तो आनंद घेऊ शकत नसाल तर ठीक आहे. हे केकसारखे आहे, जर तुम्हाला तो खायचा नसेल तर खाऊ नका. परंतु पूर्ण उत्साहाने, दैवी नियमांनुसार कार्य करत रहा आणि विवेकपूर्ण कार्य करा.

सहजयोगात जास्तीत जास्त विवाह अत्यंत यशस्वी होतात. त्या जोडप्यांची आत्मसाक्षात्कारी, अत्यंत सुंदर मुले ही आहेत आणि त्यांना बघून इतर परिवारांचाही सहजयोगात समावेश होत आहे. मला तुम्हाला हे सांगायचे आहे की, कोणत्याही पतीने असे समजू नये की, विवाहानंतर त्याला पत्नीवर रूबाब गाजवण्याचा किंवा तिच्या डोक्यावर बसण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. पाश्चात्य देशात असे होत नाही परंतु भारतात नेहमीच असे होत असते. भारतीय पुरुष अत्यंत कठोर असतात. याच्या विरूद्ध पाश्चात्य देशातील स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक आक्रमक आहेत. मला ही

गोष्ट काही समजत नाही. या स्वभावामुळे बऱ्याचवेळेस लग्न तुटतात. कोणावरही रूबाब दाखवायची आवश्यकता नाही. कोणाला त्रास देण्याची काही गरज नाही. झालेले लग्न निभावणे जर अशक्य वाटत असेल, तुमचा साथीदार अयोग्य वाटत असेल, तर सहजयोगात आम्ही घटस्फोटाची परवानगी दिली आहे. परंतु घटस्फोट घेणे हे लाजिरवाणे आहे. **जीवनातील आनंद घेण्यापेक्षा घटस्फोट घेणे मला बिलकूल आवडत नाही.**

अत्यंत सुंदर, रोमांचक अनुभव घेत तुम्ही दांपत्तिक जीवनाचा आनंद घेण्यासाठी तयार व्हा. पहिल्या दिवसापासूनच भांडायला सुरुवात करू नका. घटस्फोटासाठी जर तुम्हाला भांडायचे असेल तर वास्तविक तुम्ही आपले खानदान, आपला देश यांची बदनामी करीत असता आणि आपल्या देशातील विवाहोत्सुक मुली सहजयोगात विवाह करण्यापासून वंचित राहतील. कारण अशा देशातील मुलींचे विवाह करणे मला आवडत नाही. एक प्रथाच बनली आहे. आपण बघतोच आहोत की, गेल्या सहा-सात वर्षात कोणत्याही देशात सहज विवाह कशाप्रकारे चालले आहेत. तर जर तुम्ही सहज विवाहाचे सौंदर्य, तसेच त्याची मर्यादा गुंडाळून ठेवू इच्छित असाल, तर तुम्ही विवाह न करण्याचा निर्णय घेणे जास्त चांगले होईल. तुमचे लग्न लावून देणे हे आमचे कर्तव्य नाही, तर चांगली पत्नी किंवा चांगला पती प्राप्त करणे ही तुमची आवश्यकता आहे. या सगळ्यानंतरही जर तुम्हाला हे स्वीकार करायचे नसेल तर तुम्ही एकदम घटस्फोटाविषयीच विचार करू लागता. असे करणे लज्जास्पद आहे आणि चुकीचेसुद्धा. हे सहज जीवन दर्शवत नाही. जर तुम्ही प्रामाणिक सहजयोगी असाल, तर तुमच्या पती-पत्नीबरोबर प्रेमपूर्वक जीवन व्यतीत करण्याची योग्यता तुमच्यामध्ये असायला हवी. **सहज विवाहात श्री गणेशाचा तुमच्यावर आशीर्वाद आहे, ते तुमच्या वैवाहिक जीवनाचे संरक्षण करतील.** तुमची मदत करतील आणि तुम्हाला वाईट गोष्टींपासून वाचवतील. मला माहीत आहे की, सहजयोगात विवाह करणे किती मोठे वरदान आहे. परंतु काही मूर्ख पुरुष तसेच महिला आपल्या वैवाहिक जीवनाचा आनंद घेऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत आम्ही त्यांना घटस्फोट घेण्याची परवानगी देऊ, परंतु एकदा घटस्फोट घेतल्यानंतर सहजयोगात पुनर्विवाहासाठी आम्ही परवानगी देणार नाही. हे निश्चित आहे. ज्या व्यक्तीने एकदा घटस्फोट

घेतला आहे त्याचा विवाह आम्ही परत करून देऊ शकत नाही. जर घटस्फोटाचे कारण बरोबर असेल तर ठीक आहे. परंतु घटस्फोट घ्यायचा म्हणून घ्यायचा असे असेल तर काही विशिष्ट व्यवहारासाठी आम्ही परवानगी देणार नाही. तर मी हे सांगू इच्छिते की, सहजयोगात घटस्फोट घेणे निषिद्ध आहे. परंतु जर तुम्हाला भांडायचे असेल, त्रास द्यायचा असेल, दुसऱ्याचे जीवन नष्ट करायचे असेल तर घटस्फोट घेता येतो.

मी तुम्हाला विनंती करते की, तुम्ही तुमच्या दांपत्तिक जीवनाचा आनंद घ्या. एका देशातील लोकांचे दुसऱ्या देशातील लोकांशी लग्न लावण्याची सुरुवात आम्ही त्यांच्या आनंदासाठीच केली आहे. काल मी सांगितले होते की, तुम्ही स्वतः परस्पर विवाह करू नका. याची जबाबदारी आम्ही घेणार नाही. विवाहाचे नियोजन आम्हाला करू द्या. तुम्ही स्वतः जर असे काही कराल तर बऱ्याच निरर्थक समस्या उद्‌भवतील. जसे पाश्चिमात्य देशांमध्ये आहे. इथे येऊन ते मुलगी निवडतात किंवा आपल्याच केंद्रात मुलगी ठरवून ते इथे येतात. याचा अर्थ असा झाला की, केंद्रात येऊन ध्यान करण्याऐवजी ते मुल-मुली शोधत बसतात. अशाप्रकारचा मूर्खपणा आम्हाला थांबवायचा आहे. म्हणून जर तुम्हाला सहजयोगात विवाह करायचा असेल तर तुम्हाला तुमचा वर स्वतः शोधायचा नाही कारण तुमच्या चैतन्य लहरी किती मिळतात हे आम्हाला हे बघायचे आहे. आम्ही असे सर्व केले तरी कधी-कधी लग्न मोडतात. परंतु मी बघितले आहे की, स्वतः ठरवलेली लग्नही मोडतात. असे विवाह सर्वसाधारण लग्नांसारखे असतात. सर्वात चांगली गोष्ट ही असेल की, तुम्ही स्वतःलाच वचन द्या की, तुम्ही मूर्ख बनणार नाही आणि आपले वैवाहिक जीवन उद्‌ध्वस्त करणार नाही. तुमच्या हिताची मला काळजी आहे.

म्हणून खूप मेहनत घेऊन, शोध घेऊन, विचारपूर्वक मी हे कार्य केले आहे. विनाकारण तुम्ही मला दुःखी करू नका. माझी तुम्हाला वारंवार विनंती आहे की, तुम्ही प्रसन्न रहा. मी खूप प्रसन्न आहे. मनापासून मी तुम्हाला आशीर्वाद देते. मला विश्वास आहे की, तुमचे विवाह कार्यान्वित होतील. घाई करू नका. धीर धरा. सर्वप्रथम प्रत्येक गोष्ट सहजतेने घ्या मग तुम्ही बघाल की किती प्रेमपूर्वक तुमचे विवाह कार्यान्वित होतील.

**परमेश्वर तुम्हाला सुखी ठेवो! धन्यवाद!**

# लाल भोपळा-गाजर खीर



**साहित्य :-**

३०० ग्रॅम लाल भोपळा-साल व बिया काढून बारीक किसलेला,
१०० ग्रॅम गाजर-साल काढून बारीक किसलेले,
४०० मि.ली. दूध, १ मोठा चमचा तूप,
४ मोठे चमचे साखर चवीनुसार,
७० ग्रॅम खवा, १/२ छोटा चमचा वेलची पावडर,
१/८ छोटा चमचा केशर,
१ मोठा चमचा बदाम साल काढून कापलेले,
१ मोठा चमचा बारीक कापलेले काजू

**कृती :-**

१) दूधात किसलेला भोपळा व गाजर नरम होईपर्यंत शिजवा.
२) तूप व साखर टाकून अजून पाच मिनिट शिजवा.
३) खवा, वेलची पावडर, केशर, बारीक कापलेले काजू व बदाम टाकून चांगले हलवा. गॅसवरून उतरवा. थंड होऊ द्या.
४) आवडीनुसार केवडा किंवा गुलाब जल टाकू शकता.
गरम किंवा सर्वसाधारण तापमानावर वाढा.

# नव-आगमन

| Date | Speech Title | Place | Type | Code. Nos. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | DVD/HH | VCD/HH | ACD/HH | ACS/HH |
| 1-Feb.-78 | ब्रह्म का ज्ञान | Delhi | Sp | | | 269* | 269 |
| 23-Feb-79 | कुंडलिनी आणि सात चक्र | Ahmadnagar | Sp | | | 276* | 276 |
| 9-Mar-79 | सार्वजनिक कार्यक्रम | Delhi | Sp | | | 28* | 28 |
| 16-Jul-79 | How Truthfull are we about Seeking | | Sp | | | 313* | 313 |
| 28-Sep-79 | Navratri : Relation Between Kundalini & Kalki | Mumbai | Sp | | | 304* | 304 |
| 10-Oct-83 | Puja and Havan | Toranto | Pu | 279* | | | |
| 11-Jan-87 | Devi Puja | Paithan | Sp/Pu | 280* | | | |
| 19-Jun-90 | Shri Adishakti Puja I & II | Modling | Sp/Pu | 281* | | 423* | |
| 25-Dec-90 | Christmas Puja | Ganapatipule | Sp | | | 438* | |
| 28-Jul-91 | Guru Puja | Cabella | Sp/Pu | 216 | | 314* | 314 |
| 22-Mar-93 | सार्वजनिक कार्यक्रम | Delhi | Sp | 275* | | | |
| 12-Dec-93 | गलत गुरु एवं पैसे का चक्कर | Deharadun | Sp | 282* | | 409* | 409 |
| 8-Jun-97 | Shri Krishna Puja | New York | Sp | | | 168* | 168 |
| 23-Aug-97 | Shri Krishna Puja | Cabella | Sp | | | 162* | 162 |
| 7-Sep-97 | Shri Ganesh Puja | Cabella | Sp | | | 167* | 167 |
| 19-Apr-98 | Easter Puja | Istambul | Sp | | | 173* | 173 |
| 25-Dec-99 | Christmas Puja | Ganapatipule | Sp | | | 306* | 306 |
| 21-Mar-09 | Birthday Puja Celebrations Part I & II | Noida | Pu | 276* | | | |
| 21-Mar-09 | Musical Program-Birthday Puja | Noida | Mu | 277* | | | |
| 7-Apr-09 | Easter Puja | Noida | Pu/Mu | 278* | | | |

✦ प्रकाशक ✦

**निर्मल ट्रांसफॉर्मेशन प्रा. लि.**

प्लॉट नं.८, चंद्रगुप्त हौसिंग सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ४११ ०३८.

फोन : ०२०- २५२८६५३७, २५२८६०३२ E-mail : sale@nitl.co.in

....नंतर येतो पंधरावा दिवस, जी सर्वात अंधारी रात्र असते.
त्या रात्री तुम्ही दिवे लावता कारण ही अंधारी रात्र असते
आणि दुष्ट शक्ती आत येऊ शकतात. दिवे यासाठी लावले जातात,
की जेणेकरून लक्ष्मी आत येऊ शकेल......

– दिवाळी पूजा, १९८३

